माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक -१६२१/२०२४/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| तक्रारदार | उत्तरवादी |
|---|---|
| श्री.हनुमंत वसंत कदम | जन माहिती अधिकारी पोलिस निरीक्षक, इंदापूर पोलिस स्टेशन इंदापूर जि पुणे<br>पोलिस अधीक्षक पुणे ग्रामीण पुणे |

**(निर्णय दिनांक- ०९/०४/२०२५)**

तक्रारदार यांनी दिनांक २१ २०२४/११/रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केला आहे. तक्रारदार यांनी 'आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी पोलिस निरीक्षक, इंदापूर पोलिस स्टेशन , पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे यांनी आदेशा प्रमाणे अद्याप कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही व मागितलेली माहिती दिली नाही अशा आशयाची तक्रार केली आहे.

माहितीशी संबंधित द्वितीय अपील क्रमांक ७९५/२०२१/पुणे यामध्ये आयोगाने दिनांक ०२/१२/२०२२ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे. त्यानुसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणानी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर उपलब्ध असलेल्या अभिलेखावरून असे स्पष्ट होते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदर प्रकरणात विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलिस अधिकारी पोलिस निरीक्षक, इंदापूर पोलिस स्टेशन यांनी वर नमूद द्वितीय अपीलामध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार सदरचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात कार्यवाही करावी व तसे तक्रारदार यांना कळवावे तसेच या प्रकरणी आयोगाच्या आदेशाची अमलबजावणी करण्यात येईल याची पोलिस अधीक्षक पुणे ग्रामीण यांनी दक्षता घ्यावी. आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

वरील निर्देशानुसार तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

9.4.25

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

तक्रार क्र.-१६२१/२०२४/पुणे 7696 /2025 दिनांक 23/4/2025

रामाआ-पुणे/२०२५/RCG